


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३६३ वा मंगळवार दि १२ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# अबब आरोग्य मंत्री साहेबांच्या कार्यालयात तक्रार व पुरावे देऊन ६२१ दिवस लोटले !


# कोविड काळातील कोट्यवधींचा घोटाळा उघड; कारवाई अद्यापही ठप्प!

## शासनाच्या करोडो रुपयांवर डल्ला मारणाऱ्यांवर केंद्रीय व राज्य आयुष मंत्री आपले लक्ष केव्हा केंद्रित करणार?

**जनंसचलन/बुलढाणा**

कोविड महामारीच्या काळात महाराष्ट्रभर गाजलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात साहित्य व औषध खरेदी प्रक्रियेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणात अद्याप ठोस कारवाई न झाल्यामुळे प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत स्थानिक माध्यमांनी अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध केल्या. तसेच बुलढाणा येथील लोकप्रतिनिधींनीही या विषयावर दोन वेळा तारांकित प्रश्न उपस्थित करून एसआयटी चौकशी ची मागणी करून शासनाचे लक्ष वेधले होते.त्यानंतर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. सदर चौकशीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग स्पष्ट झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी काही तत्कालीन जिल्हा शल्य चिकीत्सक बडतर्फ वादग्रस्त भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे (रा. गोरक्षण रोड, परिसर अकोला) यांचे नाव समोर आले आहे. विशेष म्हणजे,सन २०२४ मध्ये संबंधित आरोपीची चल व अचल संपत्ती जप्त करून तिचा लिलाव करून शासनाच्या तिजोरीत रक्कम जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते.मात्र, इतका कालावधी लोटल्यानंतरही या आदेशाची अंमलबजावणी अद्याप पर्यंत झालेली नाही,ही बाब गंभीर मानली जात आहे. दरम्यान,या संपूर्ण प्रकरणाची माहिती व पुरावे दिनाक




२६/८/२०२४ राज्य व केंद्र आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा येथील कार्यालयात देण्यात आली होती.मात्र अद्यापपर्यंत कोणताही प्रतिसाद किंवा पुढील कार्यवाही झालेली नसल्याची माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधितांवर तात्काळ फौजदारी कारवाई करून, संपत्ती जप्तीची प्रक्रिया पूर्ण करावी तसेच संपूर्ण प्रकरणातील आरोपी यांची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

### प्रश्न उपस्थित झाले

✻ आदेश असूनही कारवाई का थांबली?
✻ जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे का दाखल होत नाहीत?
✻ एसआयटी चौकशीला विलंब का?

या प्रकरणात शासनाने तातडीने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

# पोटच्या मुलीची हत्या करून मृतदेहाची विल्हेवाट; जळगाव जामोद पोलिसांकडून थरार उघड

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

पोलीस स्टेशनच्या हद्दीत राजुरा शिवारात १० मे २०२६ रोजी एका महिलेचा छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने () धक्कादायक वास्तव समोर आणले आहे. स्वतःच्या वडिलांनीच मुलाच्या मदतीने आपल्या मुलीची निर्घृण हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. २६ एप्रिल २०२६ रोजी राजुरा शिवारातील एका शेताजवळ एका महिलेची मान कापलेल्या अवस्थेत अर्धवट जळालेली कवटी आणि धड पोलिसांना आढळून आले होते. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून आरोपींनी तिचे डोके धडावेगळे करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण पसरले होते. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांनी तपासासाठी वेगवेगळी पथके तयार केली. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सीमेवरील पोलीस ठाण्यांमधून बेपत्ता असलेल्या महिलांची माहिती संकलित करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, मध्य प्रदेशातील खकनार पोलीस ठाण्यात शिवानी बापूराम कलमेकर नावाची महिला बेपत्ता असल्याची नोंद आहे. पोलिसांनी शिवानीचे वडील बापूराम नथ्थु कलमेकर (५५ वर्षे) आणि भाऊ अजय बापूराम कलमेकर (२७ वर्षे) यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल केला.

शिवानीचा विवाह १५ एप्रिल रोजी झाला होता, मात्र २० एप्रिलला ती परत माहेरी आली.

शिवानीचे तिच्या चुलत भावाशी प्रेमसंबंध होते. लग्न होऊनही ती ऐकत नसल्याच्या रागातून वडील बापूराम याने तिच्या डोक्यात बांबू मारून तिची हत्या केली.

मुलीची हत्या केल्यानंतर तिचा मृतदेह एक दिवस घरातच लपवून ठेवला. त्यानंतर वडिलांनी मुलाच्या मदतीने दुचाकीवरून मृतदेह बुलढाणा जिल्ह्यातील राजुरा शिवारात



आणला आणि तिथे तिचे डोके कापून मृतदेह जाळून टाकला. ही क्लिष्ट केस सोडवण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांची मदत घेतली. अवघ्या १२ दिवसांत या क्रूर हत्येचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. दोन्ही आरोपींना जळगाव जामोद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# ....उन्हाळ्यात जनावरांना होणारी विषबाधा आणि उपाययोजना....

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या काळात जनावरांमध्ये उष्माघात, पाण्याची कमतरता, पचनाचे विकार यांसह विषबाधेच्या घटनाही वाढताना दिसतात. विषबाधा ही गंभीर समस्या असून वेळेवर उपचार न झाल्यास जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांनी या विषयाबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.

विषबाधा होण्याची प्रमुख कारणे : उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे जनावरे अनेकदा उपलब्ध असलेली कोणतीही वनस्पती खातात. यामध्ये धोतरा, आकोडा, करट, रानमेथी यांसारख्या विषारी वनस्पतींचा समावेश असू शकतो. अशा वनस्पतींचे सेवन केल्यास जनावरांना विषबाधा होण्याची शक्यता वाढते. याशिवाय शेतात फवारणी केलेल्या चाऱ्यावर राहिलेले कीटकनाशकांचे अंश, रासायनिक खते किंवा औद्योगिक रसायनांचा संपर्क हे देखील विषबाधेचे महत्त्वाचे कारण आहे. काही वेळा कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा जनावरांना दिला जातो. अशा चाऱ्यातून तयार होणारे विषारी घटक जनावरांच्या शरीरात जाऊन गंभीर परिणाम करतात. प्लास्टिक, कचरा, तेलकट पदार्थ किंवा रंगयुक्त वस्तू खाल्ल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. तसेच औषधांचा अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने वापर केल्यासही विषबाधा होऊ शकते.

विषबाधेची लक्षणे : विषबाधा झाल्यानंतर जनावरांमध्ये काही ठळक लक्षणे दिसून येतात. भूक मंदावणे किंवा पूर्णपणे बंद होणे, तोंडातून फेस येणे, लाळ गळणे, बेचैनी, इकडे-तिकडे धावणे, श्वास घेण्यास त्रास होणे, पोट फुगणे किंवा जुलाब होणे अशी लक्षणे सामान्यतः दिसतात. गंभीर अवस्थेत स्नायूंमध्ये कंप सुटणे, डोळे फिरणे किंवा अचानक मृत्यू होण्याची शक्यता देखील असते. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तात्काळ उपाययोजना : विषबाधा झाल्याचा संशय आल्यास सर्वप्रथम जनावराला विषारी पदार्थांपासून दूर करावे. तोंडामध्ये उरलेले विषारी पदार्थ काढून टाकावेत आणि स्वच्छ, थंड पाणी पाजावे. कोणतेही घरगुती उपाय किंवा औषधे स्वतःहून देऊ नयेत. तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार मिळाल्यास जनावराचा जीव वाचविणे शक्य होते.

प्रतिबंधात्मक उपाय : विषबाधा टाळण्यासाठी शेतकरी व पशुपालकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जनावरांना देण्यात येणारा चारा व खाद्यपदार्थ स्वच्छ व दर्जेदार असावा. कीटकनाशके आणि रसायने सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतातील विषारी वनस्पती ओळखून त्या नष्ट कराव्यात. जनावरांच्या गोठ्याभोवती स्वच्छता राखणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी करणे आणि पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.



उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतल्यास विषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. शेतकऱ्यांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहून आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. जनावरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक पशुपालकाची जबाबदारी आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# देशाच्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व आता महाराष्ट्राच्या हाती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/वृत्तसंस्था**

पायाभूत सुविधा, नाविण्यपूर्णता, प्रतिभा, स्वच्छ ऊर्जा, सुव्यवस्थित शहरीकरण,तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवरून भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार आहे. या सर्व शक्तींचा सहयोग साधणाऱ्या अर्थव्यवस्था भविष्याचे नेतृत्व करणार असल्याने महाराष्ट्र त्यादृष्टीने आवश्यक परिसंस्था (इकोसिस्टीम) उभारत आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

नवी दिल्ली येथील हॉटेल ताज पॅलेसमध्ये भारतीय उद्योग परिसंघा तर्फे (सीआयआय) आयोजित दोन दिवसीय परिषदेत एका परिसंवादात मुख्यमंत्री बोलत होते. सीआयआयचे संचालक जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

आजचे जग एकाच वेळी अनेक स्थित्यंतरातून जात आहे.यात भू-राजकीय विखंडन, तांत्रिक उलथापालथ, ऊर्जा संक्रमण, पुरवठा साखळीतील बदल आणि आर्थिक विकासाच्या भविष्याबद्दलची मोठी अनिश्चितता यांचा



समावेश आहे.मात्र, या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हा एकमेव देश मोठ्या प्रमाणावर जगाचा आत्मविश्वास वाढवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारताने गेल्या दशकात स्वतःबद्दल जागतिक स्तरावर नवी प्रतिमा स्थापित केल्याचे प्रारंभीच स्पष्ट करुन फडणवीस यांनी महाराष्ट्र या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले. दशकानुदशके महाराष्ट्र हे देशाचे 'इकोनॉमिक इंजिन' राहिले आहे. पण आता आम्ही त्याहूनही मोठ्या ध्येयासाठी स्वतःला तयार करत आहोत. आज राज्याची अर्थव्यवस्था ६१.६१ लाख कोटींची ( ६६० अब्ज डॉलर्स) असून ती देशाच्या सकल देशांर्गत उत्पादनामध्ये( जीडीपी) सुमारे १५ टक्के योगदान देते. देशात येणाऱ्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे.देशाच्या अभियांत्रिकी निर्यातीत राज्याचा वाटा २० टक्क्यांहून अधिक असून देशाची 'डेटा सेंटर' आणि 'स्टार्टअप' राजधानी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

भविष्यातील महाराष्ट्राबाबत आमचा रोड मॅप स्पष्ट असून २०३० पर्यंत एक लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत जगातील सर्वात महत्त्वपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्थांपैकी एक अशी अर्थव्यवस्था होईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, यावर्षी दावोसमध्ये महाराष्ट्राने जवळपास ३० लाख कोटींचे गुंतवणूक प्रस्ताव आणले. दीर्घकालीन विचार, जलद निर्णय आणि विश्वासार्हतेने अंमलबजावणी या त्रिसुत्रीची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारांच्या शोधात गुंतवणूकदार आहेत. अनिश्चिततेच्या जगात, विश्वास हीच खरी आर्थिक पुंजी असून महाराष्ट्राने हा विश्वास निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक काम केल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यातील अर्थव्यवस्था ही महामार्ग, बंदरे, विमानतळ, डिजिटल नेटवर्क्स, संशोधन प्रयोगशाळा, स्टार्टअप इकोसिस्टम आणि विद्यापीठांवर उभी असेल आणि म्हणूनच महाराष्ट्रात अभूतपूर्व वेगाने गुंतवणूक होत असल्याचे स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ,वाढवण बंदर,मेट्रोचे जाळे,औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक इकोसिस्टम, डिजिटल पायाभूत सुविधा आदी प्रकल्प एकत्रितपणे महाराष्ट्राचा आर्थिक भूगोल बदलवत आहेत आणि जेव्हा भूगोल बदलतो, तेव्हा अर्थव्यवस्था बदलते. त्यासाठी केवळ पायाभूत सुविधा पुरेशा नाहीत. भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्यासाठीची क्षमता एआय, सेमीकंडक्टर्स, इलेक्ट्रिक वाहने , प्रगत उत्पादने, स्वच्छ ऊर्जा,डेटा सेंटर्स,जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स ) आणि 'डीप-टेक' कल्पकतेवर आधारित असेल. या निकषावर महाराष्ट्र स्वतःला या बदलाच्या केंद्रस्थानी स्थापित करत आहे. आज राज्यात देशातील सर्वात मोठ्या जीसीसी केंद्रांपैकी २४ टक्के केंद्रे आहेत. राज्य आशियातील सर्वात महत्त्वाचा 'डेटा इन्फ्रास्ट्रक्चर कॉरिडॉर' म्हणून उदयास येत आहे. देशातील ६० टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनावर अंजली दमानियांचा बोचरा प्रश्न

**रत्नागिरी/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे पेट्रोलियम उत्पादनांचा जपून वापर करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. मात्र, या आवाहनावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मोदींच्या 'दुटप्पीपणा'वर सडकून टीका केली आहे. "जनतेला उपदेश आणि स्वतःसाठी कोट्यवधींचा लवाजमा, हा दुटप्पीपणा नाही का?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

तेलंगणातील हैदराबाद येथे ९,४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान मोदी बोलत होते. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून इंधनाचे दर वाढण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

या संकटाचा सामना करण्यासाठी त्यांनी देशाला 'काटकसरीचा मंत्र' दिला. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, कोरोनाकाळाप्रमाणे शक्य तिथे 'वर्क फ्रॉम होम' किंवा ऑनलाइन बैठका घ्याव्यात. पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ गरजेनुसार केल्यास परकीय चलनाची बचत होईल. स्वयंपाकातील तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी केल्यास देश आणि आरोग्य दोघांनाही फायदा होईल. तसेच परदेशी वस्तूंची यादी करून स्थानिक वस्तूंना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. त्या पुढे म्हणाल्या की, सामान्य जनतेला मेट्रोने प्रवास करा, कारपूल करा, सोने खरेदी करू नका आणि इंधन वाचवा, असा उपदेश दिला जातो. मात्र, हीच तत्त्वे स्वतःला लागू का नाहीत? "साहेब, Zoom App अजूनही चालू आहे. रॅली, सभा आणि भाषणांसाठी त्याचा वापर करता येतो. जनतेसाठी काटकसर आणि स्वतःच्या पक्षासाठी उधळपट्टी? हा दुटप्पीपणा नाही का?" असा रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला आहे. पंतप्रधानांनी भाषणात स्पष्ट केले की, जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संघर्षाचा थेट परिणाम भारताच्या परकीय चलन साठ्यावर होत आहे.

## पंतप्रधान मोदींच्या काटकसरीच्या आवाहनावर शरद पवारांची सविस्तर पोस्ट; आर्थिक मुद्द्यांना घातला हात

**चेन्नई/वृत्तसंस्था**

पुढील वर्षभरात सोनं खरेदी करू नका, परदेश दौरे टाळा, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, खाद्यतेल मर्यादित वापरा, डेस्टिनेशन्स वेडिंग टाळा असे अनेकविध आवाहन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्याने देशभरात एकच खळबळ माजली आहे. पश्चिम आशियातील अस्थिर वातावरणामुळे इंधन साठ्याचा तुटवडा निर्माण झाला असताना मोदींनी अशी वक्तव्य केल्याने सामान्य नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात



येतोय. यावर आता खासदार शरद पवार यांनीही भाष्य केलं आहे. त्यांनी सोशल मीडियावर याबाबत पोस्ट केली आहे.

"मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी काही घोषणा केल्या. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब निश्चितच काळजी निर्माण करणारी आहे", असं शरद पवार म्हणाले. देशातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात सर्वपक्षीय बैठक बोलावली जाते. यावेळीही अशीच बैठक बोलावली गेली पाहिजे, अशी मागणी शरद पवारांनी केली आहे. याबाबत ते म्हणाले, "या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधानांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय-प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे." सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच पंतप्रधानांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे", अशी ठाम भूमिका शरद पवारांनी व्यक्त केली.

## अण्णा द्रमुकमध्ये मोठी फूट ! बंडखोर गट जोसेफ विजय सरकारमध्ये सामील

**चेन्नई/वृत्तसंस्था**

तामिळनाडूच्या राजकारणात मंगळवारी एक मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. अण्णा द्रमुकच्या (AIADMK) दिवंगत नेत्या जे. जयललिता यांच्या निधनानंतर पक्षात धुमसणारी फूट आता प्रत्यक्षात आली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते एस. पी. वेुलमणी आणि सी. व्ही. षण्मुगम यांच्या नेतृत्वाखालील एका मोठ्या गटाने मुख्यमंत्री विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून, ते आज मंत्रिमंडळात सामील होणार आहेत. विशेष म्हणजे, पक्षाचे सरचिटणीस आणि माजी मुख्यमंत्री एडप्पाडी के. पलानीस्वामी (ईपीएस) यांचा आज ७२ वा वाढदिवस असून, याच दिवशी त्यांच्या हातून पक्षाचे नियंत्रण निसटल्याचे चित्र आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालांनंतर पक्षाने हा मोठा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण माजी कायदा मंत्री सी. व्ही. षण्मुगम यांनी दिले आहे. चेन्नई येथे आयोजित पत्रकार



परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे ज्येष्ठ नेते एस. पी. वेुलमणी, सी. विजयभास्कर आणि आर. कामराज यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. यावेळी षण्मुगम यांनी पक्षाचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी (EPS) यांच्यावर गंभीर आरोप केले. पलानीस्वामी हे पक्षाचा पारंपरिक कट्टर विरोधक असलेल्या द्रमुकच्या (DMK) मदतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप केला. "ईपीएस यांच्या राजकीय कारकिर्दीतील हा सर्वात कठीण दिवस आहे. ज्या दिवशी त्यांचा वाढदिवस आहे, त्याच दिवशी पक्षाचे विभाजन होणे हे दुर्दैवी आहे," अशी भावना त्यांच्या गटातील एका नेत्याने व्यक्त केली. ओ. पन्नीरसेल्वम (ओपीएस) यांना ज्याप्रमाणे ईपीएस यांनी बाजूला केले होते, आता ईपीएस यांची अवस्थाही तशीच होऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या राजकीय नाट्यामागे लॉटरी किंग सँटियागो मार्टिन यांच्या पत्नी लीमा रोझ मार्टिन यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीपूर्वी त्यांनी अण्णा द्रमुकमध्ये प्रवेश केला होता. त्यांचे जावई आधाव अर्जुन हे मुख्यमंत्री विजय यांचे जवळचे सहकारी आणि मंत्रिमंडळातील मंत्री आहेत. लीमा रोझ यांनीच टीव्हीके (TVK) आणि अण्णा द्रमुकच्या बंडखोर गटात संवाद घडवून आणला. ५ मे रोजीच त्यांनी वाटाघाटी सुरू असल्याचे संकेत दिले होते, जे आता खरे ठरले आहेत.

बंडखोर गट आज सायंकाळी 'टीव्हीके' नेत्यांची भेट घेणार आहे. मुख्यमंत्री विजय यांनी देखील 'सरकारी स्थैर्या'साठी या गटाचा पाठिंबा स्वीकारण्याचे संकेत दिले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकला ४७ जागा मिळाल्या होत्या. आता त्यातील मोठा हिस्सा बंडखोर गटाकडे जाण्याची शक्यता आहे. या वेळची फूट ही केवळ जातीय समीकरणांवर (थेवर, गौंडर किंवा वन्नियार) आधारित नसून ती सत्ता आणि अस्तित्वासाठी असल्याचे बोलले जात आहे. आमदारांना फुटण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक रसद पुरवण्यात आल्याचेही आरोप होत आहेत. "बहुतेक आमदारांना आता केवळ डीएमके (DMK) आणि टीव्हीके (TVK) मध्येच भविष्य दिसत आहे," असे एका आमदाराने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

पक्षात एवढी मोठी फूट पडलेली असतानाही आर. बी. उदयकुमार, ओ. एस. मणियन, ॲग्री कृष्णमूर्ती, थलवाई सुंदरम आणि के. पी. मुनुसामी यांसारखे काही ज्येष्ठ नेते अजूनही पलानीस्वामी यांच्या पाठीशी ठाम उभे आहेत. २०१७ पासून अनेक संकटांमधून पक्षाला वाचवणाऱ्या ईपीएस यांची पकड अखेर त्यांच्या वाढदिवशीच सैल झाली आहे.

# जंगलातून भारतात आली; इन्स्टावरच्या दोस्तासोबत संसार थाटला, बांगलादेशी तरुणीचा कारनामा

**जळगाव/वृत्तसंस्था**

जळगाव पोलिसांनी एका बांगलादेशी तरुणीला अटक केली आहे. ही तरुणी जळगावात राहणाऱ्या तरुणाच्या प्रेमात पडली आणि त्यामुळे ती भारतात बेकायदेशीरपणे आली आणि तिने त्या तरुणासोबत लग्न करत संसार थाटल्याचा दावा केला आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी पाकिस्तानातून भारतात आलेली सीमा हैदर आपल्याला सर्वांना परिचित आहेच. प्रेमातूनच सीमा ही भारतात दाखल झाली होती. अशीच ही घटना आहे. फेसबुकवर प्रेम जुळले आणि थेट बांगलादेशी तरुणी जळगावत पोहचली. या बांगलादेशी तरुणीला पोलिसांनी अटक केली असून तिला एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.जळगाव शहरातील शनिपेठ पोलिसांनी अवैधरित्या भारतात वास्तव्यास असलेल्या एका बांगलादेशी तरुणीला ताब्यात घेत तिच्यासह तिला आश्रय देणाऱ्या युवकावर



गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांना भोई गल्ली, जोशी पेठ परिसरात एक परदेशी महिला विना परवाना राहत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. यावेळी 20 वर्षीय कोणीका राणी शामलचंद्र राय ही महिला आढळून आली. तपासात ती कोणतेही वैध पासपोर्ट किंवा व्हिसा नसताना बेकायदेशीररित्या भारतात प्रवेश करून राहत असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, कोणीका राणी आणि जळगावातील सोने कारागीर चिन्मय जगन्नाथ वाला यांची फेसबुकवर ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले लग्नासाठी कोणीका हिने थेट बांगलादेशची सीमा ओलांडून भारतात प्रवेश केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी कोणीका राणी आणि चिन्मय वाला यांच्याविरुद्ध इमिग्रेशन व परदेशी कायदा २०२५ अंतर्गत गुन्हा दाखल करून बांगलादेशी तरुणीला अटक केली आहे. दरम्यान कोणीका आणि चिन्मय हे दोघेजण आम्ही लग्न केले असल्याचे सांगत आहेत. परंतु याबाबतचा त्यांच्याकडे कुठलाही पुरावा अद्याप तरी आढळून आलेला नाही. आज बांगलादेशी मोनिका राणी हिला जळगाव न्यायालयात हजर केले असता तिला एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे. तरुणी या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक साजिद मन्सूरी करीत आहेत.जळगावचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. "बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्या बांगलादेशी आणि इतर परदेशी नागरिकांच्या विरोधात जळगाव पोलिसांनी एक मोहीम हाती घेतलेली आहे. त्या अनुषंगाने जळगाव पोलिसांना एक बांगलादेशी महिला बेकायदेशीरपणे शहरात राहत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तपास केला असता, संबंधित तरुणीकडे बांगलादेशी पासपोर्ट मिळाला आहे. ही मुलगी आणि तिचा नवरा या दोघांना आरोपी म्हणून नोंद करण्यात आलं आहे", अशी माहिती श्रीकांत धिवरे यांनी दिली. "दोघांचं लग्न पश्चिम बंगालमध्ये झालं होतं. महिला जंगल मार्गाने भारतात आली होती, असं प्राथमिक तपासात समजत आहे. आज तिला कोर्टात हजर करण्यात आलं आहे. तिला जळगावला येण्यामागे प्रेम प्रकरणाचं कारण सांगितलं आहे. महिलेच्या नवऱ्याचं नाव चिन्मय पाला असं आहे. तो 25 वर्षांचा आहे. त्यांची 2024 मध्ये फेसबुकवर ओळख झाली होती. त्यांचं अफेयर झालं होतं. ती बांगलादेशातून पळून आली. त्यासाठी तिला बांगलादेशच्या दोन लोकांनी सहकार्य केलं, असं तिचं म्हणणं आहे. पश्चिम बंगालला लग्न झाल्यानंतर ती इथे आली. तिचा नवरा इथेच कामाला होता. त्यामुळे ती नवऱ्यासोबत इथे येऊन राहत होती", अशी प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

## नागपूर सायबर पोलिस ठाण्यातील दोन पीआयसह 9 कर्मचारी निलंबित

**नागपूर/वृत्तसंस्था**

५०० रुपयांचा गुन्हा दाखल करून वसुली करण्याचा ठपका ठेवत सायबर पोलिस ठाण्यातील दोन पीआयसह नऊ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले.उत्तर प्रभागाचे निरीक्षक बळीराम सुतार, दक्षिण प्रभागाचे निरीक्षक योगेश घारे, साहाय्यक पोलिस निरीक्षक विजय राणे, पोलिस शिपाई प्रफुल्ल ठाकरे, सतीश वाघ, श्रीकांत गोणेकर, सुशील चंगोले, अजय पवार व सौरभहिवरकर, अशी निलंबित केल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी केलेल्या या निलंबनाच्या कारवाईमुळे पोलिस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, दीड महिन्यांपूर्वी सायबर पोलिसांनी ऑनलाइन क्रिकेट सट्ट्यात ५०० रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. यात पुण्यातील सट्टेबाज जैन याचे नाव नव्हते. परंतु, त्याच्याकडून वसुलीसाठी हा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर साय पोलिसांचे पथक पथक पुण्याला गेले. खराडी येथील जैनच्या कार्यालयावर छापामार कारवाई केली.अटक न करण्यासाठी या पथकाने जैन याच्याकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळली. याच गुन्ह्याच्या तपासासाठी दुसरे पथक मुंबईला गेले. कारवाई न करताच या पथकाला परत बोलावण्यात आले. मुंबई व पुण्यात जाण्यासाठी दोन्ही पथकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेतली नाही अथवा स्टेशन डायरीतही तशी नोंद केली नाही. दोन्ही पथके नागपुरात परतल्यानंतर वसुलीची बाब समोर आली.एपीआय राणे यांनी शिपाई प्रफुल्ल ठाकरे यांच्यावर माहिती उघड केल्याचा आरोप केला. ठाकरे यांना मारहाण केली. त्यामुळे ठाकरे दोन दिवस शहरातून गायब झाले. अचानक ठाकरे बेपत्ता झाल्याने हे वसुलीचे संपूर्ण प्रकरणच बाहेर आले. पोलिस आयुक्तांनी पोलिस उपायुक्त नित्यानंद झा यांना चौकशीचे आदेश दिले. चौकशीत घारे, राणेसह नऊ जण दोषी असल्याचे आढळले. त्यानंतर आयुक्तांनी त्यांना निलंबित केले.

## नागपूरच्या शंकरनगर चौकात भर उन्हात ड्रामा, तरुण रस्त्यावर झोपला, बघणाऱ्यांच्या नजरा खिळल्या, सर्वच चक्रावले

**नागपूर/वृत्तसंस्था**

उपराजधानी नागपुरात सध्या उष्णतेने अक्षरशः कहर केला आहे. तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. अशा प्रचंड उन्हात नागरिक घराबाहेर पडणे टाळत असताना, शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या शंकरनगर चौकात आज भर दुपारी घडलेल्या एका विचित्र प्रकाराने नागरिकांसह पोलिसांनाही धक्का बसला. भर रस्त्यात एका तरुणाने अचानक अर्धनग्न होत चौकाच्या मधोमध झोपून अक्षरशः 'बेडरूम'सारखा आराम करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता तो निवांतपणे मोबाईलवर कोणाशी तरी गप्पा मारत पडून राहिला. या अनपेक्षित प्रकारामुळे काही काळ वाहतुकीत गोंधळ निर्माण झाला आणि चौकात बघ्यांची गर्दी जमली.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास हा तरुण अचानक चौकात आला. काही क्षणांतच त्याने अंगावरील कपडे काढले आणि तापलेल्या रस्त्यावर झोपला. रस्त्याचा तापमानामुळे सामान्य व्यक्ती काही सेकंदही उभे राहू शकत नाही, मात्र हा तरुण पूर्णपणे निर्धास्त दिसत होता. तो मोबाईल कानाला लावून एखाद्या शांत ठिकाणी बसल्यासारखा संवाद साधत होता.या घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस आणि स्थानिक पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला, कपडे परिधान करण्यास सांगितले आणि वाहतुकीत अडथळा निर्माण होत असल्याचे समजावले. मात्र तरुणाने पोलिसांच्या सूचनांकडे पूर्णपणे



दुर्लक्ष केले. तो बराच वेळ जागेवरून हलायलाही तयार नव्हता.भर चौकात सुरू असलेल्या या प्रकारामुळे वाहनचालकांची गती मंदावली. अनेकांनी मोबाईलमध्ये व्हिडीओ शूट करण्यास सुरुवात केली. काही नागरिकांनी तरुणाची मानसिक अवस्था बिघडली असावी, असा अंदाज व्यक्त केला, तर काहींनी हा एखादा निषेधाचा वेगळा प्रकार असू शकतो, अशी चर्चा सुरू केली.दरम्यान, पोलिसांनी संयम राखत त्या तरुणाला सुरक्षितपणे बाजूला नेले. प्राथमिक माहितीनुसार, तो मानसिक तणावाखाली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून त्याची ओळख पटवण्याचे तसेच त्याच्या वागण्यामागचे कारण शोधण्याचे काम सुरू आहे.उष्णतेच्या लाटेमुळे आधीच हैराण झालेल्या नागपूरकरांना या घटनेने आणखी एक धक्का दिला.

## सोलापुरात एअरगन ठेवताना गंधकाचा भीषण स्फोट; सीसीटीव्हीत थरारक घटना कैद

**सोलापूर/वृत्तसंस्था**

सोलापुरात आज अचानक धक्कादायक घटना घडली. एअरगन ठेवत असताना गंधकाचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे पपिसरात मोठी खळबळ उडाली. स्फोटामुळे जखमी व्यक्तीच्या पायाच्या अक्षरश: चिंधळ्या उडाल्या. या इसमाचे पाय छिन्नविछिन्न झाले. स्फोट झाल्यानंतर परिसरात मोठा आवाज झाला. यामुळे परिसरातील नागरिक रस्त्यावर आले. नागरिकांनी तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनास्थळी तातडीने पोलीस दाखल झाले. तसेच जखमी इसमाला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या इसमावर सध्या उपचार सुरु आहेत. घटनेनंतर परिसरात बॉम्ब शोधक आणि नाशक पथक दाखल झाल्याचीदेखील माहिती समोर आली होती. या प्रकरणात आता काय-काय माहिती समोर येते ते पाहणं महत्त्वाचे असणार आहे.सोलापूर शहरात भीषण स्फोट झाला आहे. सहारा एअरगन समोर स्फोटाची घटना घडली आहे. केदारनाथ सिद्धप्पा छत्रे (वय 53) असे जखमी इसमाचे नाव आहे.

स्फोट इतका भीषण होता की आजूबाजूचा परिसर हादरला. केदारनाथ छत्रे इसमाचे पाय छिन्नविछिन्न झाले. प्राथमिक माहितीनुसार, गंधकाचे स्फोट झाले असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. सामाजिक कार्यकर्ते राज सलगर आणि इतर नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत, जखमी केदारनाथ छत्रे



यांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुनी मिल कंपाऊंड परिसरातील शॉपिंग कॉम्प्लेक्सबाहेर सोमवारी दुपारी गंधकाच्या बॉक्सचा भीषण स्फोट झाला. 'सहारा गन हाऊस' या दुकानाच्या समोरच हा थरार घडल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. हा स्फोट इतका भीषण होता की, यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.जुनी मिल परिसरातील सहारा गन हाऊस या दुकानाच्या समोर उभ्या असलेल्या एका चारचाकी वाहनात गंधकाने भरलेला बॉक्स ठेवत असताना तो अचानक खाली पडला आणि मोठा स्फोट झाला. या दुर्घटनेत केदारनाथ छत्रे ही व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहेत. भरस्त्यात झालेल्या या स्फोटामुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# आधी विजयाचा षटकार, आता पंजाबच्या पराभवाचा चौकार; दिल्लीने दिला धक्का

**मुंबई, वृत्तसंस्था :**

पंजाब किंग्स संघाने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार सुरुवात केली होती. सुरुवातीच्या ६ सामन्यांमध्ये पंजाबने लागोपाठ ६ विजय मिळवले होते. पण आता पंजाबला लागोपाठ चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्पर्धेतील ५५ वा सामना पंजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. मोहालीच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना श्रेयस अय्य आणि प्रियांश आर्यच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर पंजाब किंग्सने २० षटकांअखेर ५ गडी बाद २१० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना डेव्हिड मिलर आणि कर्णधार अक्षर पटेलच्या दमदार खेळीच्या बळावर दिल्लीने हा सामना खिशात घातला आहे. हा सामना दिल्लीने ३ गडी राखून आपल्या नावावर केला. या विजयासह दिल्लीचा संघ अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहे.



मोहालीच्या मैदानाव दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबला जशी सुरुवात होती, तशी सुरुवात प्रियांश आर्यने करुन दिली. त्याने अवघ्या ३३ चेंडूंचा सामना करत ५६ धावा केल्या. तर प्रभसिमरन सिंगने १८ धावांचे योगदान दिले. त्यानंतर कुपर कॉनोलीने ३८ धावांची खेळी केली. तर मार्कस स्टोईनिस १, शशांक सिंग शून्यावर माघारी परतला. शेवटी शशांक सिंग २१ धावांवर नाबाद राहिला. तर कर्णधार श्रेयस अय्यर ५९ धावांवर नाबाद राहिला. या खेळीच्या बळावर पंजाब किंग्सने ५ गडी बाद २१० धावांपर्यंत मजल मारली. दिल्लीला हा सामना जिंकण्यासाठी २११ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीला हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. केएल राहुल ९ तर अभिषेक पॉरेल अवघ्या ५ धावा करून माघारी परतला. तर साहील परेखने १३ धावा करून पॅव्हेलियनची वाट धरली. त्यानंतर कर्णधार अक्षर पटेलने दिल्लीचा डाव सांभाळला.

त्याने ३० चेंडूंचा सामना करत ५६ धावांची खेळी करून दिल्लीला विजयाच्या जवळ पोहोचवलं. त्यानंतर डेव्हिड मिलरने दिल्लीच्या विजयाचा पाया रचला. त्याने ५१ धावांची खेळी केली. शेवटी आशुतोष शर्माने २४, माधव तिवारीने नाबाद १८ आणि आकिब नबीने नाबाद १० धावांची खेळी करून पंजाबला ३ गडी राखून विजय मिळवून दिला.

## राहुल द्रविड आता नव्या भूमिकेत! थेट क्रिकेट संघाचे बनले मालक

**मुंबई /वृत्तसंस्था**

सध्याच्या घडीला सगळीकडे फ्रँचायझी लीगचं प्रस्थ आहे. जगभरात बऱ्याच ठिकाणी या टी-२० लीग खेळल्या जातात. याच पार्श्वभूमीवर युरोपमध्ये एक नवीन लीग सुरू होणार असून, त्यात भारतीय क्रिकेटच्या महान दिग्गजांपैकी एक असलेल्या राहुल द्रविड यांचा संघ असेल. भारताचे माजी कर्णधार, प्रशिक्षक आणि महान फलंदाज राहुल द्रविड या लीगमध्ये संघाचे मालक म्हणून दिसणार आहेत.

युरोपियन टी२० प्रीमियर लीग फ्रँचायझी 'डब्लिन गार्डियन्स'चा मालक म्हणून त्यांची घोषणा करण्यात आली आहे. युरोपियन टी-२० प्रीमियर लीगने (ETPL) ११ मे रोजी द्रविड यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. यासह, २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या या नवीन लीगसाठीच्या सर्व सहा फ्रँचायझींची रचना पूर्ण झाली आहे. डब्लिनमध्ये आयोजित एका भव्य समारंभात राहुल द्रविड यांना डब्लिन फ्रँचायझीचा मालक म्हणून घोषित करण्यात आलं.

या कार्यक्रमाला क्रिकेट आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक प्रमुख व्यक्तींची उपस्थिती लाभली. ईटीपीएलचे सह-संस्थापक अभिषेक बच्चन यांच्यासह ख्रिस गेल, जॉन्टी ऱ्होड्स, ग्लेन मॅक्सवेल आणि फॅफ डु प्लेसिस यांसारखे दिग्गजही या लीगशी संबंधित आहेत. आपल्या नवीन भूमिकेबद्दल बोलताना राहुल द्रविड म्हणाले की, "ईटीपीएलमागील दूरदृष्टीने मला आकर्षित केलं. मला विश्वास आहे की, ही लीग केवळ युरोपमध्ये क्रिकेटला एक नवीन ओळख देणार नाही, तर तरुण खेळाडूंना प्रगती करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठही उपलब्ध करून देईल. डब्लिनमध्ये क्रिकेटची प्रचंड आवड आहे आणि विकासाची प्रचंड क्षमता आहे." द्रविड पुढे म्हणाले, "पुढच्या पिढीला घडवणं हे माझ्यासाठी नेहमीच महत्त्वाचं राहिलं आहे आणि या प्रवासात ईटीपीएल महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते, असा मला विश्वास आहे." अभिषेक बच्चन म्हणाला की, राहुल द्रविडसारखे दिग्गज खेळाडू लीगमध्ये सामील होणं हे ईटीपीएलसाठी अत्यंत विशेष बाब आहे. त्यांनी युरोपमध्ये क्रिकेटचा विस्तार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हटलं.

## "...तर मी स्वतःला आरशातही पाहू शकणार नाही"; प्रसूतीनंतरच्या संघर्षावर विनेश फोगट पहिल्यांदाच बोलली!

**जयपूर/वृत्तसंस्था**

भारतीय कुस्ती महासंघाने (WFI) विनेश फोगटला उत्तर प्रदेशातील गोंडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यापासून रोखले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे महासंघाने तिच्यावर २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांसाठी बंदी घातली आहे. यामुळे प्रसुतीनंतर पुनरागमन करण्यासाठी विनेश फोगटच्या मार्गात कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसंच, कुस्ती महासंघाने तिला कारणे दाखवा नोटिसही बजावली आहे. याबाबत तिने कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांची भेट घेऊन नोटिशीला तात्पुरते उत्तरही दिले आहे. दरम्यान, त्यांना WFI हुकूमशाही वाटत असून मॅटवर परतण्याची त्यांना भीती वाटत असल्याचं त्यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितलं. त्यांचा १० महिन्यांचा मुलगा त्यांना कशी व्यवस्थेशी दोन हात करण्याची प्रेरणा देतो इथपासून विविध मुद्द्यांवर विनेश फोगट यांनी सांगितलं.



पॅरिस ऑलिम्पिकनंतर विनेशने निवृत्ती घेतली होती. मात्र, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि ऑलिम्पिक स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून तिने पुनरागमनाचा निर्णय घेतला. संयुक्त आंतरराष्ट्रीय महासंघ आणि 'डब्ल्यूएफआय' यांच्या नियमानुसार वेळेत निवृत्ती मागे घेण्याची प्रक्रिया विनेशकडून पार पाडण्यात आली. त्यानंतर अनेक प्रयासानंतर मानांकन स्पर्धेसाठी विनेशचे नाव नोंदवले गेले. उत्तेजक सेवन प्रतिबंध संस्थेची प्रक्रिया देखील तिने पार पाडली. तिचा मानांकन स्पर्धेत खेळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, निकषच बदलल्यामुळे विनेश आता आशियाई स्पर्धेत खेळू शकणार नाहीत. २०२३ मध्ये तुम्ही जंतरमंतरवर आंदोलन केले होते, पण आता ही एक नवीन लढाई आहे. पुन्हा एकदा दीर्घकाळ लढा देण्यासाठी तयार तू तयार आहेस का? असा प्रश्न तिला विचारण्यात आला होता. त्यावर विनेश फोगट म्हणाली, कधीकधी मला वाटते की आता पुरे झाले आणि कदाचित मी माझा लढा थांबवावा. पण माझ्या लहानपणापासून आतापर्यंत मला कधीही हार मानणे आवडलेले नाही. एकतर मी सुरुवात करत नाही किंवा एकदा सुरुवात केली की ती शेवटपर्यंत नेते. जर मी हार मानली, तर मी स्वतःला आरशात पाहू शकणार नाही." "लोकांनी मला रस्त्यावर लढताना आणि ऑलिम्पिकमध्ये खेळताना पाहिले आहे, त्यामुळे यंत्रणा मला उद्ध्वस्त करू शकते असे लोकांनी विचार करावा असे मला वाटत नाही. मला अशी व्यक्ती बनायचे आहे जी शेवटच्या श्वासापर्यंत लढते, मग ती यंत्रणा माझ्या विरोधात का असेना. माझ्या नशिबाचा निर्णय दुसऱ्या कोणाही घेऊ नये असे मला वाटते. क्रिधवने (विनेश फोगट यांचा मुलगा) देखील हे जाणून घ्यावे की, तो कितीही शक्तिशाली शक्तीशी लढत असला तरी, त्याने शेवटपर्यंत लढायला तयार असले पाहिजे. जे बोलत नाहीत त्यांना कोणीही लक्षात ठेवत नाही. झाशीची राणी रणांगणावर वीरमरण पत्करल्यामुळेच आजही स्मरणात आहे", असंही ती म्हणाली.

## पंजाबच्या पराभवाने प्लेऑफचं गणित बिघडलं, ५ संघ समान गुणांवर

**मुंबई)/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ चा हा हंगाम एका नव्या, रोमांचक वळणावर येऊन पोहोचला आहे. पंजाब किंग्सच्या विजयाची मालिका थांबली आहे. एकेकाळी अजिंक्य मानल्या जाणाऱ्या या संघाला पराभवांच्या मालिकेला सामोरे जावे लागत आहे. पंजाबने सलग ६ विजयांनंतर ४ पराभव पत्करावे लागले आहेत त्यांच्या प्लेऑफमधील स्थानावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सच्या विजयानंतर गुणतालिकेचं चित्र बदललं आहे.


आणखी एका विजयानंतर गुणतालिकेत मोठी झेप घेतलेला दिल्ली कॅपिटल्स संघ प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहे. एकूणच, अव्वल चार संघ अनिश्चित आहेत आणि येत्या काही दिवसांत जसेजसे सामने खेळवले जातील तसे मोठे बदल होताना दिसतील.

पंजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात, दिल्लीने पंजाबला ३ गडी राखून पराभूत केलं. हा एक हाय-स्कोअरिंग सामना होता, जो दिल्लीने एक षटक शिल्लक असताना जिंकला. यामुळे दिल्ली कॅपिटल्सला गुणतालिकेत एका स्थानाने वर जाण्यास मदत झाली आहे. संघ पूर्वी आठ गुणांसह आठव्या क्रमांकावर होता, पण आता १२ सामन्यांमधून १० गुण मिळवून संघ सातव्या स्थानावर पोहोचला आहे. दिल्ली इथून प्लेऑफमध्ये पोहोचू शकतो, पण एक पराभवही त्यांना स्पर्धेतून बाहेर काढण्यासाठी पुरेसा ठरू शकतो. मात्र, या टप्प्यावर चुरस मात्र रंगतदार झाली आहे.

दरम्यान, पंजाब किंग्स अजूनही अव्वल चार संघांमध्ये आहे, पण सलग चार पराभवांनंतर संघ अडचणीत आहे. सध्या, आरसीबी १४ गुणांसह पहिल्या क्रमांकावर आहे. सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांचेही १४ गुण समान आहेत, पण त्यांचा नेट रन रेट थोडा कमी आहे. पंजाबचे १३ गुण असून तो चौथ्या क्रमांकावर आहे.

सध्या गुणतालिकेत चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांचे प्रत्येकी १२ गुण आहेत. याचा अर्थ असा की, जर यापैकी कोणत्याही संघाने एक सामना जिंकला, तर त्यांना पंजाबला मागे टाकून अव्वल चारमध्ये पोहोचण्याची संधी आहे. यामुळे पंजाब किंग्सला खाली जावे लागेल. याचा अर्थ असा की, येत्या काही दिवसांत गुणतालिकेत मोठी चुरस पाहायला मिळेल.

१२ मे रोजी होणारा सामना गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाईल. दोन्ही संघांचे समान १४ गुण आहेत. आजचा सामना जिंकणारा संघ थेट अव्वल स्थानी जाईल, म्हणजेच आरसीबीला अव्वल स्थानावरून नक्कीच पायउतार व्हावे लागेल. इतकेच नाही, तर विजयी संघ जवळपास निश्चितपणे १६ गुणांसह प्लेऑफसाठी पात्र ठरेल.



# भानापूर गावानजीक तिहेरी अपघात; महिलेचा जागीच मृत्यू

**जनसंचलन सुलतानपूर**

छत्रपती संभाजीनगर-नागपूर राज्य महामार्गावरील भानापूर परिसरात सोमवारी सकाळी झालेल्या तिहेरी अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दोन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. समोरासमोर धडकलेल्या दोन दुचाकींनंतर भरधाव क्रेनने धडक दिली. घटनेनंतर परिसरात काही काळ वातावरण तणावपूर्ण निर्माण झाले होते. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हिवरा खंड येथील तसलीम रमजान परसुवाले (वय ३५) हे आपल्या आई बानुबाई रमजान परसुवाले (वय ५५) यांच्यासह दुचाकी (क्रमांक एमएच २८ बीएम ४९०) वरून सुलतानपूरकडे दूध व्यवसायाच्या कामानिमित्त येत होते. त्याचवेळी सुलतानपूरकडून छत्रपती जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. येथील लक्ष्मण दामोधर मानवतकर (वय ३४) हे दुचाकी (क्रमांक एमएच २८ सीजी १३५०) ने जात होते. भानापूरजवळ दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेत बानुबाई परसुवाले रस्त्यावर फेकल्या गेल्या. त्याचवेळी मागून येणाऱ्या क्रेनचे मागील चाक अंगावर गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. संबंधित क्रेन क्रमांक एमएच २८ एझेड ९१४४ असल्याचे सांगण्यात आले. या अपघातात तसलीम परसुवाले आणि लक्ष्मण



मानवतकर हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने मेहकर रुग्णालयात करण्यात आले आहे. येथील दाखल मृत बानुबाई परसुवाले यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली

# तालखेड शिवारात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन मोताळा**

तालुक्यातील तालखेड शिवारात ३४ वर्षीय तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी बोराखेडी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गणेश सपकाळ (वय ३४, रा. तालखेड) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत विजय हरी सपकाळ यांनी बोराखेडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ मे रोजी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास विजय सपकाळ यांना दूरध्वनीवरून गणेश सपकाळ यांनी गावशिवारातील चंपालाल कलाळ यांच्या शेतातील गोंधनच्या झाडाला गळफास घेतल्याची माहिती मिळाली. त्यानंतर ते गावातील काही नागरिकांसह घटनास्थळी गेले असता गणेश सपकाळ हे झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास बोराखेडी पोलीस करीत आहेत. गणेश सपकाळ यांनी नेमक्या कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली ही बाब अद्याप स्पष्ट झालेली नाही. बोराखेडी पोलिस त्या दृष्टीने सध्या तपास करत असल्याचे सुत्रांनी सांगितले.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**

| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

(गुंतवणूक रक्कम →)

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षांपर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

## दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# नुकसानानंतरही कंपनीने शेतकऱ्यांना विमा नाकारला!

**जनसंचलन/दुसरबीड**

राज्य शासनाने एक रुपयात पीक विमा ही योजना बंद करून २०२५ च्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना स्वतः च्या खर्चाने पीक विमा भरण्याच्या सूचना दिल्यानंतर बहुसंख्य शेतकऱ्यांनी निसर्गाच्या लहरीपणाचा विचार करून आपल्या पिकांचा विमा उतरवला; मात्र अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही विमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई नाकारण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. देऊळगाव राजा, सिंदखेडराजा आणि लोणार तालुक्यात खरीप हंगामात सतत मुसळधार पाऊस झाला होता. अनेक भागांत अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाल्याने शेतातील पिके अक्षरशः पाण्यात चिरडली गेली. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांना लागवड खर्चही निघाला नसल्याची अवस्था आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत विमा कंपन्यांना नुकसानभरपाई देण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, संबंधित विमा कंपनीने या तीन तालुक्यांना अपात्र ठरविल्याने शेतकऱ्यांचा हक्काचा विमा परस्पर हिरावून घेतल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. याबाबत संतप्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांना निवेदनही सादर केले आहे. वंचित शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळवून द्यावी, तसेच पीक विमा कंपन्यांवर कारवाईची मागणी केली.


पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# बटन गोळयांची तस्करी केल्याप्रकरणी मुख्य सूत्रधारासह तिघांना केली अटक

## कारवाई, बटन गोळयांची २९ पाकिटे, सिरपच्या ७६ बॉटल जप्त

जनसंचलन बुलढाणा



नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधित बटन गोळ्यांची विक्री करणाऱ्या टोळीचा कदीम पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. यात मुख्य सूत्रधारासह तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात औषधी गोळ्या, कफ सिरप जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई नुतन वसाहत भागात करण्यात आली आहे.सय्यद सलमान सय्यद गफार (बारवार गल्ली, जुना जालना), करण सुरेंद्रसिंग ठाकुर (३०, जालना), गिरीश लक्ष्मीकांत लताड (देऊळगावराजा) अशी आरोपींची नावे आहेत. नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्यांची विक्री होत असल्याने कारवाईचे आदेश एसपी तेघबीर सिंह सिंधू यांनी दिलेले आहेत. या आधारे पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पीआय जनार्दन शेवाळे यांच्या पथकाने केली आहे. देऊळगावराजाहून गोळ्यांची आयात जालन्यातील काही आरोपी हे देऊळगावराजा येथे असलेल्या मेडीकल मधून या गोळ्या व सिरप आणत आहेत. पोलिसांनी आरोपींमध्ये खबरे तयार करुन ही माहिती घेतली. यात तीन जण अटक झाले आहे. विदर्भातील देऊळगावराजा येथून गोळ्यांची आयात होत असल्याचे पुढे आले आहे. अजून आरोपी रडारवर आहेत.

## धाड नाक्यावर ३.५२ लाखांच्या विदेशी दारु साठ्यासह कार जप्त

जनसंचलन/बुलढाणा

शहर पोलिसांनी अवैध विदेशी दारू वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत धाड नाका परिसरातून ३ लाख ५२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत विविध कंपनींच्या विदेशी दारूच्या बाटल्यांसह एक चारचाकी वाहन ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी रायपूर येथील एका युवकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ मे रोजी रात्री ९.४० वाजताच्या सुमारास धाड रायपूर येथील युवक ताब्यात; विविध कंपन्यांच्या शेकडो चाटल्या आढळल्या! नाका परिसरात पोलिसांनी संशयित वाहनाची तपासणी केली असता आरोपी उज्वल प्रकाश खंडागळे (रा. रायपूर, ता. जि. बुलढाणा) याच्या ताब्यात मोठ्या प्रमाणात विदेशी मद्यसाठा आढळून आला. या कारवाईत बीअरचे ४ बॉक्समधील ४८ बाटल्या, कॅन बीअरचे ४ बॉक्समधील ४८ बाटल्या, विदेशी दारूचे १२ टिन, बीअरच्या १२ बाटल्या, विदेशी दारूच्या १०० बाटल्या, असा विविध प्रकारचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या विदेशी दारूची किंमत सुमारे ५२ हजार ६० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय आरोपीच्या ताब्यातील एमएच २८ एएन ३४७० क्रमांकाची पांढऱ्या रंगाची कारही जप्त करण्यात आली. वाहनाची अंदाजे किंमत ३ लाख रुपये असून, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ३ लाख ५२ हजार ६० रुपये इतकी आहे. या प्रकरणी पोलिस हेडकॉन्स्टेबल दीपक लेकुरवाळे यांनी फिर्याद दिली असून, युवकाविरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जागेच्या वादातून महिलेला दीराकडून मारहाण, गुन्हा दाखल

जनसंचलन/बुलढाणा

जागेच्या वादातून महिलेला दीराकडून मारहाण, गुन्हा दाखल लोकमत न्यूज नेटवर्क

बुलढाणा : जागेच्या जुन्या वादातून एका महिलेला शिवीगाळ करून काठीने मारहाण केल्याची घटना दहीद बु, येथे घडली. या प्रकरणी बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कविता विनोद सुरशे (रा. दहीद बु, ता. जि. बुलढाणा) या ९ मे रोजी सकाळी ११ वाजता घरासमोर गावातील महिलांसोबत बोलत उभ्या होत्या. त्यावेळी त्यांचा दीर क्रिष्णा संतोष सुरशे याने जागेच्या जुन्या वादातून त्यांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. कविता सुरशे यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, क्रिष्णा याने जमिनीवरील काठीने मारहाण केली. त्यानंतर त्याची आई पार्वताबाई सुरशे व वडील संतोष सुरशे यांनीही शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## मोताळा बसस्थानकातून प्रवासी महिलेचे दागिने चोरीला !

जनसंचलन/मोताळा




बसस्थानक परिसरातील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी प्रवासी महिलेच्या पर्समधील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना रविवारी सकाळी मोताळा बसस्थानकात उघडकीस आली. छत्रपती संभाजीनगर येथील सिडको परिसरातील रहिवासी कल्पना दिनेश इंगळे या लग्नसमारंभासाठी मोताळा येथे आल्या होत्या. रविवारी सकाळी अकराच्या सुमारास त्या मलकापूर-छत्रपती संभाजीनगर बसने परत जात असताना ही घटना घडली. बसमध्ये चढल्यानंतर त्यांनी पर्स तपासली असता त्यातील एक हजार रुपयांची रोख रक्कम, १७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत तसेच ७० गोलमणी असलेली दुसरी सोन्याची पोत असा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. फिर्यादीत दागिन्यांची किंमत सुमारे २३ हजार रुपये नमूद करण्यात आली असली, तरी सध्याच्या बाजारभावानुसार या दागिन्यांची किंमत अधिक असल्याची चर्चा आहे. घटनेनंतर महिलेने पोलिसात तक्रार दिली.

पाहिजेत
We are Hiring

खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा.लि.
बुलढाणामध्ये
ज्वेलरी शोरुमसाठी तरुण, उत्साही उमेदवार पाहीजेत.

1) शॉप मॅनेजर- 1 (M/F)
कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक व ज्वेलरी कामाची माहीती असलेल्या अनुभवी व्यक्तींना प्राधान्य

2) सेल्स एग्जीक्यूटिव - 5 (M/F)
बारावी शिक्षण आवश्यक, स्मार्ट व हसतमुख, कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक.

3) कॅशियर - 2 (M)
पदवीधर आणि तत्पर, जबाबदारीने कॅश काउंटर हाताळण्याचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य

आजच संपर्क करा..!

सर्व पदांसाठी सरकारी नियम (PF/ESIC) अनुसारआकर्षक पगार, इन्सेंटीव्हज व ईतर अलाउंस

आपली संपूर्ण माहिती व फोटोसह आपले अर्ज ई-मेल करा
hrkjapl@gmail.com
अधिक माहितीसाठी संपर्क: 9545454762 / 9545450822